**नियमित दिवाणी कज्ञा क्र. ३३१/२०१२ मधील नि.क्र. १६२ वरील**

**आदेश**

( पारीत दिनांक – ०१/०१/२०२६)

शिवाजी ज्ञानु पाटील वि. दिनकर ज्ञानु पाटील

१. प्रस्तुतचा अर्ज वादी निशाणी क्र. ११४, ११५, ११६ व ११८ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करुणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, सदर कामी निशाणी क्र. ११४, ११५ व ११६ प्रमाणे नजर चुकीने व अनावधानाने दाव्यात दुरुस्ती करणे राहून गेले असून नि.११८ वर प्रतिवादी क्र. १ व वादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दिलेला अर्ज मंजूर झालेनंतर प्रस्तुत नि. ११८ मधील प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांमधील वारस नं. ३ रमेश दिनकर पाटील यांना नजरचुकीने व अनावधानाने दाव्यामध्ये नावाची दुरुस्ती नजर चुकीने करणेची राहून गेली आहे. तरी, सदरची दुरुस्ती करणेस परवानगी मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जाच्या मागील बाजुस प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदरचा अर्ज खोटा, चुकीचा, लबाडीचा असून प्रतिवादी क्र. १ यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी प्रतिवादी नं. १ वारसांमधील वारस नं.३ यांचे नावाची दुरुस्ती केलेली नाही. यावरुन वादी यांना सदरचा दावा प्रोलॉग करणेचा दिसून येत आहे. तसेच, अशा स्वरुपाची दुरुस्ती परवानगी वादी यांना मागता येत नाही. तरी, वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा व खर्च म्हणून रक्कम रु. ५०००/– करणेत यावे अशी विनंती प्रतिवादी क्र. १ यांनी केली आहे.

४. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणी दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत कामी निशाणी क्र. ११४, ११५, ११६ व नि. ११८ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. वास्तविक पाहता, सदर नि. ११४, ११५ व ११६ वर दि. १५/०३/२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आलेला असून तेव्हापासून वादींनी त्याअनुषंगाने दुरुस्ती अथवा पुर्तता केलेली नसल्याचे दिसून येते. तसेच नि. ११८

वर दि. ०५/०२/२०२२ रोजी आदेश पारित करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा दावा जवळपास १३ वर्षांहून जुना आहे. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता, दुरुस्ती करणेस झालेल्या विलंबाचा तसेच दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. सबब, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.१६२) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. १०००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.01.01 17:30:50 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – ०१/०१/२०२६ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.